जलसंपत्ती विकास प्राधिकरण

---

सदस्यांना प्रवास भत्ता व दैनिक भत्ता देण्याबाबत

महाराष्ट्र शासन,
शासन निर्णय क्र.ग्रापापु-१०९५/सीआर-११५५/पापु-०७,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक : २५ सप्टेंबर,१९९६.

पहा :- या विभागाचा समक्रमांकाचा शासन निर्णय, दिनांक ३० मे, १९९६.

शासन निर्णय :-

या विभागाच्या उपरोक्त दिनांक ३० मे, १९९६ च्या शासन निर्णयान्वये, मा.मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली जलसंपत्ती विकास प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. सदर प्राधिकरणावर अशासकीय सदस्यांची नेमणूक करण्यात आली असून, त्यांना प्राधिकरणाच्या वेळोवेळी होणा-या बैठकांना उपस्थित रहाण्यासाठी द्यावयाचा प्रवास भत्ता व दैनिक भत्ता शासनाच्या वित्त विभागाचे परिपत्रक क्र. प्रवास-१९८८/प्र.क्र.८५/सेवा-५, दिनांक १४.३.१९८८ मध्ये विहित केल्यानुसार पुढीलप्रमाणे अनुज्ञेय राहील:-

"अशासकीय सदस्यांचा प्रवासभत्ता व दैनिक भत्ता, मुंबई नागरी सेवा नियम खंड २ मधील परिशिष्ट ४२ [अ] यातील सेक्शन १ मधील १ [१][बी] च्या तरतुदीनुसार व शासन निर्णय, वित्त विभाग क्र.टीआरए-१९७७/१०३२/सी/एसईआर-५ दि. २३.९.१९७७ व क्र.टीआरए-१०८३/१४२३/एसईआर-५ दि.१.२.१९८४ च्या आधारे नियमित केला जावा. या नियमांच्या तरतूदी केवळ रेल्वे/सडक प्रवासासाठी लागू असल्यामुळे तसेच शासनाच्या काटकसरीच्या धोरणानुसार प्रथम श्रेणीच्या शासकीय अधिका-यांना विमान प्रवास करण्यावर बंदी असल्यामुळे, अशासकीय सदस्यांना विमान प्रवास तसेच रेल्वेचा वातानुकूलित प्रथम वर्गाचा प्रवास अनुज्ञेय असणार नाही.

"समितीवर अशासकीय सदस्य म्हणून असणा-या आमदार/खासदार यांचा प्रवासभत्ता/दैनिकभत्ता, शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक टीआरए-१९७०/१३१/ अठरा, दिनांक २७.१.१९७१ प्रमाणे आमदार/खासदार यांना विधानमंडळाच्या कामकाजासाठी अनुज्ञेय असलेल्या दराप्रमाणे नियमित केला जावा."

२. यावरील खर्च "मागणी क्रमांक वाय-३४५१, सेक्रेटरीएट आर्थिक सेवा-०९०-सेक्रेटरीएट-पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग [३४५१०४६७] ०२-प्रवास भत्ता." या लेखाशिर्षाखाली मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा व सदर खर्च त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

..२/-

34

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाचा x x x x x x x x x x x x x x

४. ~~सदर शा.नि.वि.वि.~~ च्या अनौपचारिक संदर्भ क्र. ८०८/९६/सेवा-५ दि. २४/९/९६ अन्वये त्या विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ म. गो. पंचभाई ]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१] मा. राज्यपालांचे सचिव,
२] मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव,
३] मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव,
४] सर्व मंत्र्यांचे स्वीय सहाय्यक,
५] सर्व राज्यमंत्र्यांचे स्वीय सहाय्यक,
६] जलसंपत्ती विकास प्राधिकरणाचे सर्व सदस्य,
७] महालेखापाल १-२ [लेखा व अनुज्ञेयता] महाराष्ट्र राज्य मुंबई/नागपूर,
८] महालेखापाल १-२ [लेखा परिक्षा] महाराष्ट्र राज्य मुंबई/नागपूर,
९] अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
१०] निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
११] सर्व मंत्रालयीन विभाग,
१२] सर्व विभागीय आयुक्त,
१३] सर्व जिल्हाधिकारी,
१४] सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१५] सदस्य सचिव, महाराष्ट्र पाणी पुरवठा व जल निःसारण मंडळ, मुंबई,
१६] पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी,
१७] पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व कार्यासने,
१८] निवड नस्ती पापु-०७.

जिल्हा परिषदांच्या पाटबंधारे
विभागांतर्गत नविन विभाग/उपविभागांसाठी
निर्माण करावयाची पदे व वाहने खरेदी
संदर्भात नविन लेखाशीर्ष उघडणे-

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्र. ग्रापापु१०९३/प्र.क्र. ८१९/पापु०७
मंत्रालय- मुंबई ४०००३२ दि. ४ ऑक्टोबर, १९९६.

शासन निर्णय:-

जिल्हा परिषदांच्या लघुपाटबंधारे विभागांतर्गत नविन विभाग/उपविभाग निर्माण करुन त्या नव्याने निर्माण होणा-या विभाग/ उपविभाग यांच्या करीता वेगवेगळया संवर्गातील पदे निर्माण करणे तसेच विभाग/ उपविभागांसाठी आवश्यक असलेल्या वाहनांची खरेदी करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. या करीता सन १९९६-९७ आर्थिक वर्षासाठी मागणी क्रमांक वाय-२ अंतर्गत पुढील प्रमाणे लेखाशीर्ष उघडण्यास शासन मान्यता देत आहे:-

२२१५ पाणी पुरवठा व स्वच्छता,

०१, पाणी पुरवठा

००१-संचालन व प्रशासन

[एक] पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी/

विभागीय/उपविभागीय आस्थापना ।
[२२१५ १८४३] दत्तमत,
[२२१५ १८५२] भारित.

२. वरील लेखाशीर्षाच्या संदर्भात महालेखापाल महाराष्ट्र-१, मुंबई व महालेखापाल महाराष्ट्र-२, नागपूर यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या नोंदवहीत वर्ष १९९६-९७ या आर्थिक वर्षा पासून वरील लेखाशीर्ष उघडण्यात यावे. सर्व संबंधित आहरण व संवितरण अधिका-यांनीही वरील लेखाशिर्षाची नोंद घ्यावी.

३. हे आदेश वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक ५९७/अ.सं. १६, दि. २५.९.१९९६ व लेखा व कोषागारे संचालनालयाचा अनौपचारीक संदर्भ क्रमांक तांत्रिक/संगणक १२९६/अनौसंदर्भ-४९/९६, दि. ३ ऑक्टोबर १९९६ अन्वये त्या विभागांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(स्वाक्षरी)

[ ग.गो. पंचभाई ]

30

प्रति,

१] महालेखापाल, महाराष्ट्र-१ [ लेखा व अनुज्ञेयता], मुंबई (५ प्रतीसह),

२] महालेखापाल, महाराष्ट्र-१ [लेखा व परिक्षा ], मुंबई (५ प्रतीसह ),

३] महालेखापाल, महाराष्ट्र-२ [ लेखा व अनुज्ञेयता], नागपूर (५ प्रतीसह),

४] महालेखापाल, महाराष्ट्र-२ [ लेखा व परिक्षा ], नागपूर ( ५ प्रतीसह),

प्रत -

१] सर्व विभागीय आयुक्त
२] प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहाय्यक
३] संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, मुंबई.
४] सहसंचालक लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, मुंबई.
५] सर्व जिल्हाधिकारी,
६] सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
७] सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी.
८] जिल्हा कोषागार अधिकारी, सर्व जिल्हे
९] मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवि मुंबई.
१०] सर्व उपमुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधीलेखा,
११] वित्त विभाग व्यय-१५ व अर्थसंकल्प -१६, व्यय-३,
१२] नियोजन विभाग / पाटबंधारे विभाग
१३] ग्राम विकास व जलसंधारण विभाग
१४] पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी
१५] पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व कार्यासने
१६] निवडनस्ती पापु-१७